# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक **VISHWA PANTHASTHA**

वर्ष १० | अंक २ | सप्टेंबर २०२५ | मूल्य ₹ १०० | AED 10 | USD 2 | www.panthastha.com



**Business mentoring isn't just for struggling startups or fresh entrepreneurs. It's a powerful tool for anyone aiming to grow, pivot, or refine their business journey. Here's a breakdown of who benefits most from it:**

**Who Needs Business Mentoring?**

**1. Aspiring Entrepreneurs**

- Those with a business idea but unsure how to start.
- Mentors help validate concepts, build business plans, and avoid rookie mistakes.

**2. Startup Founders**

- Navigating early-stage chaos—funding, hiring, product-market fit.
- Mentors offer real-world experience and strategic guidance.

**3. Small Business Owners**

- Looking to scale operations, improve profitability, or enter new markets.
- Mentors provide insights into growth strategies and operational efficiency.

**4. Corporate Professionals Transitioning to Entrepreneurship**

- Those leaving stable jobs to start a venture.
- Mentors help bridge the mindset shift and build entrepreneurial confidence.

**5. Young Entrepreneurs & Students**

- Building ventures while still in school or early in their careers.
- Mentors offer encouragement, networking opportunities, and skill development.

**6. Women & Minority Entrepreneurs**

- Often face unique challenges in funding, visibility, and networking.
- Mentors can offer tailored support and help navigate systemic barriers.

**7. Anyone Feeling Stuck or Burned Out**

- Whether it's stagnation or decision fatigue, a mentor can reignite clarity and motivation.

**Why It Matters**

Mentors aren't just advisors - they're sounding boards, connectors, and sometimes even catalysts for transformation. Their rich experience can save you years of trial and error.

If you're curious, you can book a mentoring session. ▶ ***Fees - INR 5,000 each session.***

INCUBATE PARTNERS

MENTORING * INCUBATION * GROWTH
SUSTAINABILITY * FUNDING

Incubate Partners, Pune
www.in3bet.com | mentor@in3bet.com | +91 834 933 1708

# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

# अनुक्रमणिका


१. संपादकीय - वाटचाल विश्व पांथस्थ ची

२. एनआरआय - वास्तवाचं निरीक्षण

३. निसर्गायण - स्वाती कडवे



विश्व पांथस्थ
वर्ष १० । अंक २
सप्टेंबर २०२५

अनिवासी भारतीयांसाठीचे पहिले मराठी मासिक

संपादक
संदीप वसंतराव कडवे

संपादकीय व वितरण साहाय्य
राजन ताबडे, अबू धाबी
धवल नांदेडकर, फुजेरा
देविका घोरपडे, इंदौर
डॉ.नितीन गायकवाड, औरंगाबाद

मुखपृष्ठ आणि सजावट
विश्व पांथस्थ

मूल्य ₹ 100 | AED 10 | US$2

Vishwa Panthastha
Year 10 Issue 2
September 2025

First Marathi Monthly For NRIs

Editor
Sandeep Vasantrao Kadwe

Editorial & Distribution Support
Rajan Tawde. Abu Dhabi
Dhawal Nandedkar, Fujerah
Devika Ghorpade - Indore
Dr. NitinGaikwad-Aurangbad

Cover & Design
VISHWA PANTHASTHA

Price ₹ 100 | AED 10 | US$2

विश्व पांथस्थ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक संदीप वसंतराव कडवे यांनी ए-७०३, निसर्ग सिटी -२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे - ४११०५७. येथे प्रसिध्द केले.
**संपादक - संदीप वसंतराव कडवे**
**(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)**

Vishwa Panthastha' monthly publication is owned, printed & published by Sandeep Vasantrao Kadwe. and published at A-703, Nisarg City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057.
Mob.: +91 9860678844
e-mail: editor@panthastha.com
website: www.panthastha.com
Editor - Sandeep Vasantrao Kadwe
(Responsible for Selection of News & Articles under the PRB Act.)



या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## संपादकीय



# वाटचाल विश्व पांथस्थ ची

- डॉ. संदीप कडवे

विश्व पांथस्थ या अनिवासी भारतीयांकरता प्रकाशित होणाऱ्या मासिकाची सुरवात २०१६ साली झाली. सुरवातीला दुबईतून प्रकाशित होणारे हे मासिक नंतर RNI रजिस्ट्रेशन झाल्यानंतर अधिकृतरीत्या भारतातून पुणे येथून प्रकाशित होऊ लागले. विश्व पांथस्थची आजवर ९ वर्षातील वाटचाल बघता हा प्रवास खूपच आनंददायी आणि सुंदर होता.

विश्व पांथस्थ मासिकाचे संपादक प्रकाशक डा. संदीप कडवे यांनी २००७ साली NRI Remittances From GCC या विषयात PhD करण्यास सुरवात केली. २०१० साली PhD पूर्ण झाली. परीक्षक, इतर मान्यवर यांच्या आग्रहाखातर त्यांनी २०१२ साली NRI Remittances हे पुस्तक दुबईत लिहिले आणि तिथेच प्रकाशित केले. या पुस्तकाला छान प्रतिसाद मिळाला. अनिवासी भारतीयांचे इतर देशांसाठी व भारतासाठी असलेले योगदान हे संपुर्ण आकडेवारी व विश्लेषणासहित दिलेले हे पहिलेच पुस्तक असल्याने याचा वापर अनेक संस्थांनी संदर्भ पुस्तक म्हणून करायला सुरवात केली. पुढे ३ वर्षात खूप बदल झाले आणि पुस्तक पुनर्प्रकाशित करण्याची गरज निर्माण झाली. परंतु डॉ. संदीप कडवे यांनी मराठीतून अनिवासी भारतीयांसाठी त्याच्या समस्या मांडण्यासाठी, त्यांनी लिहिलेले साहित्य प्रकाशित करण्यासाठी आणि सर्व अनिवासी भारतीयांसाठी एक स्वतंत्र मंच तयार करण्याचा संकल्प केला. त्यानुसार विश्व पांथस्थ या मासिकाची सुरवात २०१६ मध्ये झाली. विश्व पांथस्थ मासिकाच्या च्या पहिल्या अंकाच्या तीन हजार प्रती छापून वितरीत करण्यात आल्या. नंतर छापील प्रती कमी परंतु ई-मासिक स्वरुपात जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहचावे असे प्रयत्न आहेत. वाचकांचा या मासिकाला खूपच चांगला प्रतिसाद आहे. हा अंक यु ए ई व्यतिरिक्त ओमान, बहरीन, कतार, सौदी, कुवेत, सिंगापूर, यु के, कॅनडा, हॉलंड, अमेरिका, जपान, मलेशिया, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, रशिया या देशात, महाराष्ट्राबाहेर भारतात व महाराष्ट्रात देखील वितरीत होत आहे. या सर्व ठिकाणी मराठी मंडळी मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित व स्थायिक झाली आहेत. यातील काही मंडळी भारतात आल्यावर भेट घेतात, अंक बरोबर नेतात, ज्यामुळे पोस्टेज चा खर्च कमी होतो. तसेच थेट मराठी वाचकांपर्यंत मासिक पोहचते. अनेक मंडळांच्या त्या त्या देशात सांस्कृतिक कार्यक्रम असतात, तिथे जास्तीच्या प्रति वितरित करण्यासाठी दिल्या जातात. अजून पांथस्थाने मोठ्या प्रमाणावर वार्षिक वर्गणी घेण्याचे टाळले आहे. मासिकाचा खर्च जाहिरातीमधून निघावा असा प्रयत्न आहे. अनेक मान्यवर कंपन्यांनी पूर्वी स्वयंस्फूर्तीने जाहिराती दिल्या आहेत. जाहिरातींचा ओघ कायम राहिल्यास मासिकाचे प्रकाशन व वितरण यासाठी मोठी मदत होणार आहे. विश्व पांथस्थ मासिकाचे निवडक अंक www.panthastha.info या संकेतस्थळावर पीडीएफ स्वरूपात आहेत जगभरचे वाचक याचा लाभ घेऊन वाचू शकतात.

अमेरिकेत साधारण ८ लाख मराठी राहत असावेत तर जगभर साधारण २० लाख मराठी असावेत असा अंदाज आहे. आखाती देशात अंदाजे ४ लाख मराठी (महाराष्ट्राशी संबंधित) राहात असावेत व त्यातील अंदाजे दोन लाख मराठी केवळ यु ए ई

(युनायटेड अरब अमिरात) मध्ये असावेत असा एक अंदाज आहे. महाराष्ट्राबाहेर मध्य प्रदेश व गुजरात मध्ये मराठी बहुसंख्येने आहेत. जगातील २५ पेक्षा जास्त देशांत मराठी माणूस पोहचला आहे. यातील बहुसंख्य मराठी कुठल्या न कुठल्या माध्यमातून एकत्र येण्याचा प्रयत्न करतात, परंतु सर्वांपर्यंत एका पोहोचणे एक आव्हानच आहे. विश्व पांथस्थ चा हा मंच या बहुतांशी अनिवासी मराठी वाचकांपर्यंत प्रिंट व सॉफ्ट कॉपी स्वरूपात पोहचण्याचा एक चांगला मार्ग आहे. पांथस्थाचा आग्रह प्रिंट वर आहेच, कारण प्रिंट कॉपी अनेक महिने वर्ष आपल्या समोर राहू शकते, अनेक लोक त्यांच्या सोयीनुसार अंक, लेख वाचू शकतात. छापील अंक वाचण्याचा एक वेगळाच आनंद आहे. पांथस्थ ने आपल्या प्रिंट कॉपी ची गुणवत्ता कायम उत्कृष्ट ठेवली आहे, त्यामुळे अंक वाचनीय व संग्राह्य होतो.

पांथस्थ फक्त मासिक नाही. पांथस्थ हि एक संकल्पना आहे. पांथस्थाचा प्रवास सतत सुरु असतो. त्याची सुरुवात कधी झाली माहित नाही. शेवट कुठे कसा होणार माहित नाही. त्यामुळे निष्कारण चिंता न करता केवळ प्रवासाचा आनंद घ्यावा, बरोबर कमी ओझे बाळगले कि हा आनंद अधिक वाढतो, अशी हि संकल्पना आहे. याचा अर्थ कर्म करू नये असे नाही. तर ही साधारण निष्काम कर्मयोग या संकल्पनेशी मिळती जुळती संकल्पना आहे. विश्व पांथस्थ च्या पहिल्या अंकापासून अनेक यशश्वी अनिवासी भारतीयांवर लेख लिहिले गेले आहेत, त्याची यशोगाथा वाचकांसमोर मांडली आहेच. व्यक्तीशी निगडीत आहेच, पण पांथस्थ एक विचार, एक जीवनशैली देखील आहे. महाराष्ट्रात न राहणारा महाराष्ट्रीअन किंवा मराठी माणुस म्हणजे पांथस्थ असे आपण म्हणतो. मुळ गाव व घर सोडून उपजीविकेसाठी जगभर गेलेला, स्थलांतरित झालेला अनिवासी भारतीय म्हणजे विश्व पांथस्थ. महाराष्ट्र सोडून परराज्यात व परदेशात गेलेला मराठी माणुस हा देखील पांथस्थ व परराज्यातून महाराष्ट्रात उपजीविकेसाठी महाराष्ट्रात येउन मराठी झालेला माणुस देखील पांथस्थच. या पांथस्थांचे महाराष्ट्राच्या समाजकारणात, अर्थकारणात व राजकारणात खूप महत्व आहे. त्यांच्या गरजा समजून घेणे व त्यानुसार शक्यतो एकमेकांना मदत करणे काळानुसार अत्यावश्यक झाले आहे. अर्थात पांथस्थ हा एक विचार देखील आहे. ज्याचा प्रवास सतत चालू आहे, जो अनावश्यक ओझे जवळ बाळगत नाही व जो प्रवासाचा आनंद लुटतो तो देखील पांथस्थच. आध्यात्माच्या भाषेत सांगायचे झाले तर परमात्म्यापासून अलग झालेला आत्मा, ज्याने तात्पुरते मनुष्य शरीर धारण केले आहे असा जीव म्हणजे देखील पांथस्थ च.

आजपर्यंत अनिवासी मराठी (किंवा नोन रेसिडेंट महाराष्ट्रीअन किंवा NRM) च्या (म्हणजे पणजी, इंदोर, भोपाळ, बडोदा, सुरत, जुनागढ, लखनौ, कोलकता, कन्याकुमारी पासून अदिस अबाबा, लंडन, म्यूनिक, टोक्यो, टोरोंटो, मेलबर्न, मलेशिया सर्वच ठिकाणच्या) वैयक्तिक किंवा सामाजिक प्रश्नांचा उहापोहच झाला नाही कारण त्यातील बहुतांशी समस्या समोरच आल्या नाहीत . मग त्यावर उपाय शोधणे दूरच. NRM ची एक समूह म्हणून देखील फारशी ओळख निर्माण झाली नाही, कारण त्यांना एकत्र आणण्याचा फारसा प्रयत्न झाला नाही. काही ठिकाणी महाराष्ट्र मंडळा सारख्या संस्था निर्माण झाल्या, पण त्यांचे उद्दिष्ट व पोहोच मर्यादित राहिली. मंडळात येणारी मंडळी एकमेकांना खुपदा फक्त चेहऱ्याने ओळखतात, काही जण नावाने ओळखतात. कालांतराने कौटुंबिक ओळख निर्माण होते, परंतु अधिकांशी मंडळी आपल्या कोशातून बाहेर येऊन निर्मळ सामाजिक संवाद साधतांना दिसत नाहीत. असा संवाद होणे हि आता काळाची गरज आहे. याच गरजेतून पांथस्थ या मंचाची निर्मिती झाली आहे. पांथस्थ च्या माध्यमातून NRM संबंधात अनेक गोष्टींची चर्चा आपण करत आहोत. एकमेकांची ओळख करून घेत आहोत , विचारांची देवाण घेवाण करत आहोत, जमेल तशी एकमेकांना मदत हि करणार आहोत, म्हणजे असा उद्देश आहे. यात सर्व NRM अर्थात पांथस्थ अर्थात अनिवासी मराठी मंडळीचा उस्फुर्त सहभाग अपेक्षित आहे. आता सोशल मीडिया मुले अनेक स्थानिक मंडळे निर्माण झाली आहेत, त्याच्या अनेक उपक्रमांबाबत पांथस्थाने या पूर्वी आपल्या अंकात लेख लिहिले आहेत. काही सामाजिक उपक्रमात अनिवासी भारतीयांना मदत करावीशी वाटली, तर ती मदत पांथस्थाच्या माध्यमातून गरजू लोकांपर्यंत पोहचवली आहे. पोलादपूर येथे पावसाळी भूसख्खलन झाले त्यावेळी कुवैत मधून अनिवासी भारतीयाची मदत पांथस्थच्या माध्यमातून आपण गरजूपर्यंत पोहोचवली. अनिवासी भारतीय नेहमीच मदत करायला तयार असतात, परंतु त्यांना नक्की कुणाला मदतीची गरज आहे ते माहित नसते. पांथस्थाचा भारतात संपर्क मोठा असल्याने नक्की गरज कुठे हवी आहे याचा

अंदाज असतो. त्यामुळे पांथस्थ हा सामाजिक प्रकल्पांसाठी एक महत्वाचा दुवा बनला आहे. जशी भारतात गरज असते, तशी भारताबाहेर राहणाऱ्या अनिवासी भारतीयांना देखील अनेकदा मदतीची गरज असते. त्यांनाही पांथस्थ तर्फे प्राधान्याने मदत केली जाते. त्याच्या अडचणीसाठी आवाज उठवला जातो. कोरोना काळात परदेशातून भारतात विमानसेवा बंद असल्याने अनेक अनिवासी भारतीय परदेशात अडकून पडले होते. त्यांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली होती. त्याबद्दल पांथस्थ ने प्रथम आवाज उठवला. भारतीय दूतावासासी, अनेक मान्यवरांशी, अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. त्यानंतर काही स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून विमानसेवेसाठी परवानगी घेऊन भारतीयांना भारतात परत आणले गेले. परतणारे भारतीय, अनिवासी भारतीयांचे भारतातील व परदेशातील अर्थव्यवस्थेमध्ये योगदान, आरोग्य, शिक्षण, व्यवसाय, उद्योग, विश्व मराठी साहित्य संमेलन, परदेशातील गणेश उत्सव, अशा अनेक विषयांवर पांथस्थ ने लेख लिहिले आहेत, विशेषांक काढले आहेत. असे कार्य जागतिक स्तरावर करणारे विश्व पांथस्थ हे एकमेव मराठी मासिक आहे. अनेक एनआरआय भारतात आल्यानंतर निसर्गाच्या सानिध्यात राहणे पसंत करतात. त्यांच्यासाठी पांथस्थ फार्म हे पुण्यापासून १४५ कि.मी. अंतरावर सर्व सोईंनी युक्त असे फार्म हाऊस तयार केले आहे. कौटुंबिक स्नेह मेळावा, योग शिबिर किंवा शांतपणे राहण्यासाठी हे ठिकाण अतिशय योग्य आहे. पांथस्थ फार्म वर राहणेसाठी +९१ ८३४९३३१७०८ या व्हॉटस्‌ॲप नंबरवर संपर्क करावा. पांथस्थ कम्युनिटी इनिशिएटिव्ह अंतर्गत इनक्युबेट पार्टनर्स यांच्या माध्यमातून स्टार्टअप आंत्रप्रुनर्स बिझनेसमेन, विद्यार्थी, प्रोफेशनलस्‌ आणि एनआरआय यांच्यासाठी मेन्टरिंग व इनक्युबेशन सपोर्ट उपलब्ध करून दिला जातो. निवडक बिझनेससाठी फंडिंग आयोजित केले जाते. या फंडिंगमध्ये एनआरआय देखील एंजल इंव्हेस्टर्स म्हणून सामिल होऊ शकतात. तसेच पांथस्थतर्फे फर्स्ट संडे हा सोशल इंम्पॅक्ट इनिशिएटिव्ह गेली ४ वर्षे पुण्यात अविरत चालविण्यात येत आहे. या माध्यमातून अनेक सामाजिक, कौटुंबिक व औद्योगिक प्रश्नांवर सविस्तर चर्चा होते व एकमेकांबरोबर काम करण्याची संधी मिळते. जुन २०२५ मध्ये सृजन २०२५ या परिसंवादाचे इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअर्स शिवाजी नगर, पुणे येथे आयोजन करण्यात आले होते. त्याला सुप्रसिद्ध उद्योजक पद्मश्री डॉ. अरूण फिरोदिया, डॉ. अरविंद नातु, डॉ. पंडित विद्यासागर, डॉ. के.सी.मोहिते व इतर अनेक मान्यवरांनी सहभागी होत मार्गदर्शन केले. या परिसंवादाला १५० पेक्षा अधिक डेलिगेटस्‌ उपस्थित राहिले.

भारतातील व भारताबाहेरील अनेक मान्यवरांनी पांथस्थच्या उपक्रमाची दाखल घेतली आहे, त्याची प्रशंसा केली आहे व शुभेच्छा देखील दिल्या आहेत. मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भारताचे पासपोर्ट मन म्हणून प्रसिद्ध असलेले व मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे, IFS यांनी प्रत्र पाठवून पांथस्थाच्या उपक्रमाची गरज विशद केली, शुभेच्छा दिल्या. अनेक मान्यवर लेखकांनी विश्व पांथस्थ मध्ये लेखन केले आहे. पांथस्थ मध्ये अनिवासी भारतीयांनी लिहिलेल्या लेखांना, साहित्याला प्राधान्य दिले जाते. प्रसिद्ध लेखक श्री. रवींद्र गुर्जर हे पांथस्थ च्या दुबईतील प्रकाशनासाठी उपस्थित होते व त्यांनी विश्व पांथस्थच्या काही अंकांच्या संपादनाची जबाबदारी पार पडली आहे. सचिन परब, रवींद्र गुर्जर, संजय आवटे, संजय सोनवणी, कॅप्टन निलेश गायकवाड व प्रमोद गायकवाड, डॉ. नितीन गायकवाड, प्रवीण मानकर, गणेश पोटफोडे, ब्रिजमोहन हेडा, चैत्राली पंकज, महेश सोनावणे, प्रा.आनंद काटीकर, प्रचिती तलाठी, शामसुंदर जोशी, पियू गडकरी वालावलकर, गायत्री गुर्जर गजभिये, प्रबोध वेखंडे, डॉ.गिरीश जाखोटिया, डॉ.स्नेहा कुलकर्णी, अमर हबीब, राजेंद्र खेर, एअर मार्शल भूषण गोखले, अरुंधती डुंबरे, सुरेश खोपडे, सतीश देशमुख, मयूर बागुल, देविका घोरपडे, अमित देवडे, धवल नांदेडकर, सतीश शर्मा, अतुल कुलकर्णी, ॲड.समीर शिंदे, निलेश अभंग, धनश्री पाटील, अनिल पाटील, विवेक कडवे, रमेश आराख, प्राजक्ता जोशी, ललित कुमार मंडलिक, विशाल अहिरराव, संतोष शरद राऊत, आनंद बनसोडे, संजय दाबके या व इतर अनेक मान्यवर लेखकांनी विश्व पांथस्थ मध्ये लेख कविता या माध्यमातून आपले योगदान दिले आहे. विश्व पांथस्थाचा हा प्रवास अविरत चालू आहेच. या प्रवासात व आनंदयज्ञात आपले स्वागत आहे.

**डॉ. संदीप कडवे**
**संपादक - विश्व पांथस्थ**
**पुणे, १ सप्टेंबर २०२५**

# एनआरआय - वास्तवाचं निरीक्षण

परतणारे एनआरआय यांचेवर मागील विश्व पांथस्थच्या अंकांत एक सविस्तर लेख लिहिला होता. अनिवासी भारतीय भारतात परतण्याची अनेक कारणे असु शकतात. एक एनआरआय व्यक्ती उत्तर अमेरिकेत १५ वर्ष राहून नुकताच चेन्नईला परतला आहे, त्याने सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्टमधून त्याच्या अनुभवांची स्पष्ट आणि थेट मांडणी केली आहे.

**❊ प्रमुख मुद्दे:**

- सुरुवातीचा उत्साह असूनही जीवनशैलीशी जुळवून घेणे कठीण ठरले.
- मुलं अजूनही समायोजन करत आहेत. शाळांचे शुल्क अत्यंत जास्त (३-४ लाख रुपये), तरीही पूरक क्लाससाठी भरमसाट खर्च.
- मैदानी खेळाच्या जागा निकृष्ट, आणि बंदिस्त जागा फारच महाग.
- जीवनावश्यक खर्च अपेक्षेपेक्षा जास्त. जिमसाठी महिन्याला ४-५ हजार रुपये. अन्नाची गुणवत्ता चिंताजनक. वर्क-लाइफ बॅलन्स नाही.
- स्टार्टअप चालवित असतानाही कर्मचाऱ्यांना सांभाळणे कठीण. पाश्चिमात्य कार्यशैली राबवायचा प्रयत्न अपयशी ठरला.
- घरकामासाठी मदतनीस शोधणे, ट्रॅफिकमुळे दररोज ४-५ तास प्रवास हे ही समस्या. काही सकारात्मक गोष्टी जसे की पालकांसोबत राहणे आणि स्टार्टअपवर काम करणे.

**❊ नेटिझन्सच्या प्रतिक्रिया:**

- भारत स्वस्तच असेल हे गृहितक चुकीचे आहे.
- भारतातील टी१ शहरांचा खर्च परदेशातील शहरांपेक्षा जास्त.
- चेंगट मनोवृत्ती ठेवून तुलना करणे थांबवा.
- जर राहण्याच्या आणि ऑफिसच्या जागा योग्य निवडल्या नाहीत तर ट्रॅफिक जास्त होणारच.
- भारत आणि कॅनडा यांची तुलनाच अर्थहीन आहे.

**परदेशात राहणाऱ्या अनिवासी भारतीयांचे सांख्यिकी चित्र**

भारताचे परदेशस्थ भारतीयांचे प्रमाण जगात सर्वाधिक आहे. लाखो अनिवासी भारतीय (NRIs) आणि भारतीय वंशाचे लोक (PIOs) वेगवेगळ्या देशांत स्थायिक आहेत. खाली त्यांचे महत्त्वाचे सांख्यिकी तपशील दिले आहेत:

**❊ एकूण परदेशस्थ भारतीयांचे प्रमाण**

- एकूण संख्या: सुमारे ३५.४ दशलक्ष
- NRIs: अंदाजे १५.८५ दशलक्ष
- PIOs: जवळपास १९.५७ दशलक्ष

**❊ भारतीयांची मोठी लोकसंख्या असलेले देश**

| **देश** | NRIs | PIOs | **एकूण परदेशस्थ भारतीय** |
|---|---|---|---|
| अमेरिका | २.०८ दशलक्ष | ३.३३ दशलक्ष | ५.४ दशलक्ष |
| युएई | ३.५५ दशलक्ष | १४,५७४ | ३.५७ दशलक्ष |
| मलेशिया | १,६३,१२७ | २.७५ दशलक्ष | २.९१ दशलक्ष |
| कॅनडा | १.०२ दशलक्ष | १.८६ दशलक्ष | २.८८ दशलक्ष |
| सौदी अरेबिया | २.४६ दशलक्ष | २,९०६ | २.४६ दशलक्ष |
| म्यानमार | २,६६० | २ दशलक्ष | २ दशलक्ष |
| यूके | ३६९,००० | १.४९ दशलक्ष | १.८६ दशलक्ष |
| दक्षिण आफ्रिका | ६०,००० | १.६४ दशलक्ष | १.७ दशलक्ष |
| श्रीलंका | ७,५०० | १.६ दशलक्ष | १.६ दशलक्ष |
| कुवेत | ९९३,२८४ | २,२४४ | ९९६,००० |

स्रोत: भारत सरकारचे परराष्ट्र मंत्रालय

**⁕ आर्थिक योगदान**

- भारताने २०२४ मध्ये १२९ अब्ज डॉलर्स एवढे परकीय चलन हस्तांतर (remittances) प्राप्त केले - जगातील सर्वाधिक.
- NRIs आपले योगदान माहिती तंत्रज्ञान, आरोग्य सेवा, वित्तीय सेवा, शिक्षण इ. क्षेत्रांत देतात.

**⁕ अनिवासी भारतीयांचे (NRIs) भारताच्या अर्थव्यवस्थेतील योगदान**

अनिवासी भारतीय हे भारताच्या अर्थव्यवस्थेचे एक महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या आर्थिक योगदानामुळे भारताला परकीय चलन, गुंतवणूक, तंत्रज्ञान, आणि सामाजिक विकास यामध्ये मोठा फायदा होतो. खाली त्यांचे विविध प्रकारचे योगदान सविस्तरपणे दिले आहे:

**१. परकीय चलन हस्तांतरण (Remittances)**

- २०२४ मध्ये भारताला १२९ अब्ज डॉलर्स इतके परकीय चलन प्राप्त झाले, जे जगात सर्वाधिक आहे.
- हे हस्तांतरण भारताच्या विदेशी चलन साठ्यात वाढ करते आणि रुपयाच्या स्थैर्याला मदत करते.
- GDP मध्ये सुमारे ३% योगदान हे फक्त remittances मुळे होते.

**२. बँक ठेवी व गुंतवणूक**

- NRI लोक विविध बँक योजनांमध्ये NRE/NRO खात्यांद्वारे गुंतवणूक करतात.
- १३६ अब्ज डॉलर्स इतक्या NRI ठेवी फेब्रुवारी २०२३ मध्ये नोंदवण्यात आल्या.
- रिअल इस्टेट, शेअर बाजार, आणि स्टार्टअप्समध्येही मोठ्या प्रमाणावर NRI गुंतवणूक होते.

**३. ज्ञान व कौशल्य हस्तांतरण**

- अनेक NRI तंत्रज्ञान, शिक्षण, आणि संशोधन क्षेत्रात भारतात mentorship व प्रशिक्षण देतात.
- उच्च शिक्षण घेतलेले NRI भारतात उच्च दर्जाचे स्टार्टअप्स सुरू करतात.

**४. थेट परकीय गुंतवणूक (FDI)**

- NRI लोक भारतात आरोग्य, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा यामध्ये FDI आणतात.
- यामुळे नवीन रोजगार निर्मिती होते आणि उद्योग क्षेत्राला चालना मिळते.

**५. सामाजिक व परोपकारी योगदान**

- शिक्षण, आरोग्य, आणि ग्रामीण विकासासाठी NRI फाउंडेशन व NGO द्वारे मदत करतात.
- अनेक NRI शाळा, हॉस्पिटल्स, आणि प्रशिक्षण केंद्रे उभारतात.

**६. भारताची जागतिक प्रतिमा व सांस्कृतिक प्रभाव**

- NRI हे भारताचे सांस्कृतिक राजदूत आहेत.
- ते भारताच्या सॉफ्ट पॉवरला चालना देतात आणि परदेशात भारताची सकारात्मक प्रतिमा निर्माण करतात.

**अनिवासी भारतीयांच्या (NRIs) योगदानाचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम**

अनिवासी भारतीयांचे आर्थिक योगदान हे भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी एक मजबूत आधारस्तंभ ठरते. त्यांच्या विविध प्रकारच्या गुंतवणुकीमुळे आणि परकीय चलन हस्तांतरणामुळे भारताच्या आर्थिक विकासाला अनेक स्तरांवर चालना मिळते. खाली त्याचे प्रमुख परिणाम दिले आहेत:

**१. GDP मध्ये वाढ**

- NRIs भारताच्या GDP मध्ये सुमारे ३% ते ३.४% पर्यंत योगदान देतात.
- हे योगदान थेट उपभोग, गुंतवणूक आणि बचत यामध्ये वाढ घडवते.

**२. परकीय चलन साठा व स्थैर्य**

- १२९ अब्ज डॉलर्स इतके remittances २०२४ मध्ये भारतात आले.
- यामुळे भारताचा विदेशी चलन साठा ६00 अब्जच्या वर गेला आणि रुपयाचे मूल्य स्थिर राहिले.

**३. गुंतवणूक व रोजगार निर्मिती**

- NRI गुंतवणूक रिअल इस्टेट, स्टार्टअप्स, आणि पायाभूत सुविधांमध्ये होत असल्यामुळे नवीन उद्योग आणि रोजगार निर्माण होतात.
- उच्च शिक्षित NRIs भारतात उच्च दर्जाचे स्टार्टअप्स सुरू करतात, जे नवकल्पना आणि तंत्रज्ञानाला चालना देतात.

**४. बँकिंग व वित्तीय प्रणालीला बळकटी**

- NRI ठेवींमुळे भारतीय बँकांना स्थिर भांडवल मिळते, ज्यामुळे कर्जवाटप आणि आर्थिक विस्तार शक्य होतो.
- NRE/NRO खात्यांमधून मोठ्या प्रमाणावर निधी भारतात येतो.

**५. ज्ञान व कौशल्य हस्तांतरण**

- परदेशात काम करणारे NRI आंतरराष्ट्रीय अनुभव, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन कौशल्य भारतात आणतात.
- यामुळे भारतातील उद्योग अधिक स्पर्धात्मक आणि जागतिक दर्जाचे बनतात.

**६. आर्थिक संकटात मदतीचा हात**

- जागतिक आर्थिक अस्थिरतेच्या काळात NRI remittances हे भारतासाठी मॅक्रोइकोनॉमिक कुशन ठरतात.
- व्यापार तूट वाढली तरी remittances मुळे ती भरून निघते.

**७. भारताची जागतिक प्रतिमा व सॉफ्ट पॉवर**

- NRIs हे भारताचे सांस्कृतिक आणि आर्थिक राजदूत आहेत.
- त्यांच्या यशामुळे भारताची जागतिक ओळख आणि विश्वासार्हता वाढते.

**अनिवासी भारतीयांच्या (NRI) योगदानाचा भारतातील शिक्षण क्षेत्रावर प्रभाव**

अनिवासी भारतीय (NRIs) हे भारतातील शिक्षण क्षेत्रात एक शांत क्रांती घडवत आहेत. त्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि बौद्धिक योगदानामुळे लाखो विद्यार्थ्यांचे जीवन बदलत आहे. खाली त्यांच्या प्रभावाचे विविध पैलू दिले आहेत:

**१. आर्थिक गुंतवणूक व शाळा उभारणी**

- अनेक NRI व्यक्ती आणि संस्था भारतात शाळा, महाविद्यालये, आणि विद्यापीठे उभारतात.
- उदाहरण: Azim Premji Foundation ने २९ अब्ज डॉलर्सची निधी शिक्षणासाठी दिली असून ३.५ लाख शाळांना मदत केली आहे.
- Teach for India, Pratham, आणि Heartfulness Education Trust सारख्या उपक्रमांना NRI निधी मिळतो, जे गरीब व वंचित विद्यार्थ्यांसाठी शिक्षण सुलभ करतात.

**२. शिष्यवृत्ती व आर्थिक सहाय्य**

- अनेक NRI व्यक्ती शिष्यवृत्ती योजना चालवतात, ज्यामुळे गरीब व हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळते.
- उदाहरण: Nita Reddy (UK) यांनी आंध्र प्रदेशातील मुलींना कॉलेज शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली.

**३. तंत्रज्ञान व स्मार्ट शिक्षण**

- NRI लोक स्मार्ट क्लासरूम, डिजिटल टॅबलेट्स, आणि शैक्षणिक सॉफ्टवेअर पुरवतात.

- उदाहरण: कॅलिफोर्नियातील एका NRI ने तमिळनाडूमधील गावात स्मार्ट क्लासरूम सुरू केली, ज्यामुळे विद्यार्थ्यांचे परीक्षेतील गुण वाढले.

**४. ग्रामीण व आदिवासी भागात शिक्षण**

- NRI निधीमुळे दुर्गम भागात शाळा, ग्रंथालये, आणि प्रशिक्षण केंद्रे उभारली जातात.
- Pratham संस्था मुंबईतील झोपडपट्टीतून सुरू होऊन आज लाखो मुलांना शिक्षण देते.

**५. NGO व CSR सहकार्य**

- NRI लोक विश्वसनीय NGO सोबत भागीदारी करून शिक्षण प्रकल्प राबवतात.
- Bal Raksha Bharat सारख्या संस्थांद्वारे शाळेचे साहित्य, गणवेश, पुस्तकं, आणि फी पुरवली जाते.

**६. क्राउडफंडिंग व सामाजिक गुंतवणूक**

- NRI लोक Ketto, Milaap, Impact Guru सारख्या प्लॅटफॉर्मवरून क्राउडफंडिंगद्वारे शाळा, प्रयोगशाळा, आणि डिजिटल साधने पुरवतात.

**एकूण परिणाम**

- शिक्षण क्षेत्रात NRI योगदानामुळे:
- शाळा गळती कमी होते
- गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध होते
- कौशल्य विकास व रोजगार संधी वाढतात
- NEP २०२० सारख्या धोरणांना चालना मिळते

**अनिवासी भारतीयांचे (NRI) परकीय चलन हस्तांतरण - महाराष्ट्रातील ठळक उदाहरणे**

महाराष्ट्र हे भारतातील सर्वाधिक remittances प्राप्त करणारे राज्य असून, FY२४ मध्ये देशात आलेल्या १२९ अब्ज डॉलर्सपैकी सुमारे २०.५% हिस्सा महाराष्ट्राने मिळवला. हे योगदान केवळ आकड्यांपुरते मर्यादित नाही-तर राज्याच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासातही त्याचा ठळक प्रभाव आहे. खाली काही विशिष्ट उदाहरणे दिली आहेत:

**१. शिक्षण क्षेत्रातील योगदान - पुणे व औरंगाबाद**

- पुण्यातील MIT World Peace University आणि Symbiosis International University यांना अनेक NRI Alumni नी शिष्यवृत्ती निधी व संशोधनासाठी अनुदान दिले आहे.
- औरंगाबादमधील ग्रामीण भागात काही NRI डॉक्टरांनी मोफत डिजिटल शिक्षण केंद्रे सुरू केली आहेत, जिथे विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण दिले जाते.

**२. आरोग्य सेवा - कोल्हापूर व सातारा**

- कोल्हापूर जिल्ह्यातील एका NRI डॉक्टरने आरोग्य मित्र नावाचा उपक्रम सुरू केला, ज्यात दर महिन्याला मोफत आरोग्य तपासणी शिबिरे घेतली जातात.
- सातारामधील एका NRI संस्थेने स्थानिक हॉस्पिटलसाठी डायलिसिस मशीन व वैद्यकीय उपकरणे पुरवली.

**३. ग्रामीण विकास - विदर्भ व मराठवाडा**

- विदर्भातील अमरावती जिल्ह्यात एका NRI उद्योजकाने पाणी साठवण टाकी व सौर ऊर्जा यंत्रणा बसवून गावाचा पाणी प्रश्न सोडवला.
- मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात NRI निधीने महिला बचतगटांना प्रशिक्षण व व्यवसायासाठी कर्ज दिले गेले.

**४. रिअल इस्टेट व उद्योजकता - मुंबई व नाशिक**

- मुंबईत अनेक NRI गुंतवणूकदारांनी स्टार्टअप्स व टेक कंपन्यांमध्ये निधी गुंतवला आहे, ज्यामुळे नवउद्योजकांना चालना मिळाली.

- नाशिकमध्ये NRI निधीने आधुनिक कृषी तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प सुरू झाले आहेत.

**५. आर्थिक परिणाम**

- महाराष्ट्रातील बँकांमध्ये NRI खात्यांमधून २४ अब्जहून अधिक ठेवी जमा झाल्या आहेत.
- या निधीमुळे कर्जवाटप, MSME विकास, आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळाली आहे.

**महाराष्ट्रातील जिल्ह्यांवर अनिवासी भारतीयांच्या (NRI) परकीय चलन हस्तांतरणाचा ठळक परिणाम**

महाराष्ट्र हे भारतातील सर्वाधिक remittances प्राप्त करणारे राज्य असून, FY२५ मध्ये देशात आलेल्या १३५.४६ अब्ज डॉलर्सपैकी सुमारे २०.५% हिस्सा महाराष्ट्राने मिळवला आहे. हे योगदान केवळ आकडेवारीपुरते मर्यादित नसून, राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये सामाजिक, आर्थिक आणि विकासात्मक बदल घडवणारे ठरले आहे. खाली काही ठळक जिल्ह्यांतील उदाहरणे दिली आहेत:

**१. मुंबई जिल्हा - आर्थिक केंद्रबिंदू**

- मुंबईतील अनेक NRI व्यक्तींनी स्टार्टअप्स, टेक कंपन्या आणि CSR प्रकल्पांमध्ये गुंतवणूक केली आहे.
- Powai आणि BKC परिसरात NRI निधीमुळे इन्क्युबेशन हब्स आणि इनोव्हेशन सेंटर उभारले गेले आहेत.
- शैक्षणिक संस्थांमध्ये संशोधनासाठी निधी दिला जातो, विशेषतः IIT Bombay आणि NMIMS सारख्या संस्थांना.

**२. पुणे जिल्हा - शिक्षण व तंत्रज्ञान**

- पुण्यातील MIT, Symbiosis, आणि Fergusson College यांना NRI Alumni कडून शिष्यवृत्ती व संशोधन अनुदान मिळते.
- हडपसर व औंध परिसरात काही NRI संस्थांनी डिजिटल लायब्ररी व स्मार्ट क्लासरूम सुरू केल्या आहेत.
- पिंपरी-चिंचवड भागात तंत्रज्ञानावर आधारित कौशल्य प्रशिक्षण केंद्रे उभारली गेली आहेत.

**३. कोल्हापूर जिल्हा - आरोग्य सेवा सुधारणा**

- कोल्हापूर शहरात एका NRI डॉक्टरने आरोग्य मित्र उपक्रम सुरू केला, ज्यात दर महिन्याला मोफत आरोग्य तपासणी शिबिरे घेतली जातात.
- शाहूवाडी तालुक्यात NRI निधीने प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी वैद्यकीय उपकरणे पुरवली गेली आहेत.

**४. अमरावती जिल्हा - ग्रामीण विकास**

- चांदूर बाजार तालुक्यात एका NRI उद्योजकाने सौर ऊर्जा प्रकल्प व जलसंधारण यंत्रणा बसवून गावाचा पाणी प्रश्न सोडवला.
- दर्यापूर भागात महिला बचतगटांना व्यवसायासाठी प्रशिक्षण व सूक्ष्म कर्ज दिले गेले.

**५. नाशिक जिल्हा - कृषी व उद्योजकता**

- सिन्नर व इगतपुरी तालुक्यात NRI निधीने हाय-टेक शेती प्रकल्प सुरू झाले आहेत.
- नाशिक शहरात काही NRI गुंतवणूकदारांनी अन्न प्रक्रिया उद्योगांमध्ये निधी गुंतवला आहे.

**✻ एकूण परिणाम**

- या जिल्ह्यांमध्ये NRI योगदानामुळे :
- स्थानिक रोजगार संधी वाढल्या
- शैक्षणिक दर्जा सुधारला
- आरोग्य व पायाभूत सुविधा बळकट झाल्या
- ग्रामीण भागात आर्थिक सक्षमीकरण झाले



शहरी Gen Z कर्मचाऱ्यांनी दर तीन महिन्यांनी निसर्गात वेळ का घालवावा?

आजच्या आधुनिक युगात Gen न म्हणजेच १९९७ ते २०१२ दरम्यान जन्मलेली पिढी, कामाच्या आणि तंत्रज्ञानाच्या गतीने वेगाने पुढे जात आहे. शहरी भागात काम करणारे हे तरुण कर्मचारी सतत स्क्रीनसमोर, मिटिंग्समध्ये, आणि डेडलाइनच्या दबावाखाली जगत आहेत. त्यांच्या जीवनशैलीत निसर्गाशी संपर्क जवळजवळ नाहीसा झाला आहे. पण याच पिढीसाठी दर तीन महिन्यांनी निसर्गात वेळ घालवणे हे केवळ विश्रांतीसाठी नव्हे, तर मानसिक, शारीरिक आणि सामाजिक आरोग्यासाठी अत्यावश्यक आहे.

**मानसिक आरोग्य आणि निसर्गाचा संबंध -**

शहरी जीवनशैलीत मानसिक तणाव हा एक सामान्य भाग झाला आहे. सतत कामाचा ताण, सोशल मीडियाचा अतिरेक, आणि एकाकीपणा यामुळे Gen Z मध्ये anxiety, depression आणि burnout यासारख्या समस्या वाढत आहेत.

निसर्ग तणाव कमी करतो: संशोधनानुसार, झाडांची हिरवळ, निसर्गातील शांतता आणि पक्ष्यांचे आवाज हे मेंदूतील cortisol (तणाव निर्माण करणारे हार्मोन) कमी करतात.

मन शांत होते: निसर्गात चालणे, झाडाखाली बसणे किंवा नदीकाठी वेळ घालवणे हे ध्यानधारणा करण्यासारखे प्रभावी ठरते.

डिजिटल डिटॉक्स: निसर्गात असताना मोबाइल, लॅपटॉपपासून दूर राहिल्यामुळे मेंदूला विश्रांती मिळते आणि मानसिक थकवा कमी होतो.

**शारीरिक आरोग्यासाठी निसर्गाचा लाभ -**

शहरी Gen Z कर्मचाऱ्यांचे बहुतेक काम हे बसून, स्क्रीनसमोर होते. त्यामुळे शारीरिक हालचाल कमी होते आणि त्याचा परिणाम आरोग्यावर होतो.

शारीरिक हालचाल वाढते: निसर्ग सहलीत चालणे, ट्रेकिंग, पोहणे यामुळे शरीर सक्रिय राहते.

व्हिटॅमिन D मिळते: सूर्यप्रकाशात वेळ घालवल्यामुळे हाडे मजबूत होतात आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

झोप सुधारते: निसर्गातील शांतता आणि ताज्या हवेमुळे झोपेची गुणवत्ता सुधारते, जे मानसिक आरोग्यासाठीही फायदेशीर आहे.

**सर्जनशीलता आणि प्रेरणा -**

Gen Z ही पिढी सर्जनशीलतेसाठी ओळखली जाते. पण सततच्या कामाच्या गडद वातावरणात प्रेरणा हरवते.

नवीन कल्पना सुचतात: निसर्गातील विविधता, रंग, आवाज हे मनाला प्रेरणा देतात.

कामात नवचैतन्य येते: निसर्गातून परतल्यावर कामात उत्साह आणि ऊर्जा वाढते.

संकट सोडवण्याची क्षमता वाढते: निसर्गात वेळ घालवल्यामुळे मन अधिक स्पष्ट होते आणि निर्णय घेणे सोपे जाते.

**सामाजिक आणि भावनिक संबंध -**

शहरी जीवनात एकाकीपणा वाढत आहे. Gen Z कर्मचाऱ्यांना अनेकदा सोशल मीडियावर जरी कनेक्टेड वाटत असले, तरी प्रत्यक्षात भावनिक संबंध कमकुवत झाले आहेत.

मित्रांसोबत वेळ घालवता येतो: निसर्ग सहलीत एकमेकांशी संवाद वाढतो, नातेसंबंध मजबूत होतात.

स्वतःशी नातं जोडता येतं: निसर्गात एकांतात वेळ घालवणे म्हणजे आत्मपरीक्षणाची संधी.

भावनिक समतोल राखला जातो: निसर्गातील शांतता आणि सौंदर्य मनाला स्थैर्य देते.

**आत्मविकास आणि निसर्ग -**

Gen Z ही पिढी स्वतःच्या ओळखीचा शोध घेत आहे. करिअर, नातेसंबंध, आणि जीवनशैली याबाबत अनेक प्रश्न त्यांच्या मनात असतात.

आत्मपरीक्षणाची संधी: निसर्गात एकांतात वेळ घालवल्यामुळे स्वतःशी संवाद साधता येतो.

मूल्यांची पुनर्रचना: निसर्गातील साधेपणा आणि सौंदर्य जीवनातील खऱ्या मूल्यांची आठवण करून देतो.

ध्यान आणि मनन: निसर्गात ध्यानधारणा केल्यास मन अधिक स्थिर होते आणि आत्मविश्वास वाढतो.

**तंत्रज्ञान आणि निसर्ग यांचा समतोल -**

Gen Z ही डिजिटल पिढी आहे. पण तंत्रज्ञानाचा अतिरेक आरोग्यावर परिणाम करतो.

डिजिटल थकवा कमी होतो: सतत स्क्रीनसमोर राहिल्यामुळे डोळ्यांवर आणि मेंदूवर ताण येतो. निसर्गात वेळ घालवल्यामुळे हा ताण कमी होतो.

फोकस सुधारतो: निसर्गातून परतल्यावर कामात लक्ष केंद्रित करणे सोपे जाते.

तंत्रज्ञानाचा वापर अधिक जबाबदारीने: निसर्गात वेळ घालवल्यावर तंत्रज्ञानाचा वापर अधिक विचारपूर्वक केला जातो.

**दर तीन महिन्यांनी निसर्ग सहल का? -**

दररोज निसर्गात वेळ घालवणे शक्य नसले तरी दर तीन महिन्यांनी एक छोटा ब्रेक घेणे हे अनेक कारणांनी फायदेशीर आहे:

सहज शक्य असलेली वेळ: तीन महिन्यांत एक long weekend किंवा सुट्टी मिळवणे शक्य असते.

कामाचा ताण कमी करण्यासाठी योग्य अंतर: तीन महिन्यांत कामाचा ताण वाढतो, आणि त्याला ब्रेक देणे आवश्यक असते.

सवय निर्माण होते: नियमितपणे निसर्गात जाण्याची सवय लागल्यास ती दीर्घकालीन आरोग्यासाठी फायदेशीर ठरते.

**व्यावसायिक जीवनात निसर्गाचा प्रभाव -**

Gen Z कर्मचाऱ्यांना त्यांच्या करिअरमध्ये सतत नवीन गोष्टी शिकाव्या लागतात, नव्या जबाबदाऱ्या घ्याव्या लागतात. निसर्गात वेळ घालवल्यामुळे व्यावसायिक जीवनातही सकारात्मक बदल दिसून येतो.

- **नेतृत्वगुण वाढतात**: निसर्ग सहलीत निर्णय घेणे, टीमसोबत काम करणे यामुळे नेतृत्वगुण विकसित होतात.
- **समस्या सोडवण्याची क्षमता वाढते**: निसर्गातील अनुभवांमुळे विविध दृष्टिकोनातून विचार करण्याची सवय लागते.
- **सकारात्मकता वाढते**: निसर्गातून परतल्यावर कामात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो.

Gen Z कर्मचाऱ्यांनी दर तीन महिन्यांनी निसर्गात वेळ घालवणे ही केवळ विश्रांती नव्हे, तर एक जीवनशैली सुधारण्याची प्रक्रिया आहे. मानसिक तणाव, शारीरिक थकवा, सर्जनशीलतेचा अभाव, आणि सामाजिक एकाकीपणा यावर निसर्ग हे प्रभावी उत्तर आहे. निसर्गात वेळ घालवणे म्हणजे स्वतःला पुन्हा शोधणे, नवचैतन्य मिळवणे आणि जीवनाशी पुन्हा जोडले जाणे.

शहराच्या गडद वातावरणातून बाहेर पडून निसर्गाच्या कुशीत काही क्षण घालवले, तर जीवन अधिक समृद्ध, संतुलित आणि आनंददायक होईल. म्हणूनच, Gen Z कर्मचाऱ्यांनी दर तीन महिन्यांनी निसर्गात वेळ घालवण्याची सवय लावणे ही काळाची गरज आहे.

जर Gen Z ना वाटत असेल की माझ्याकडे वेळ नाही, तर लक्षात ठेवा -निसर्गात घालवलेला वेळ म्हणजे स्वतःसाठी केलेली गुंतवणूक आहे. पुढच्या long weekend साठी एखादी निसर्ग सहल प्लॅन करायला हरकत नाही ना?



विश्व पांथस्थ
अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

# ADVERTISEMENT RATE CARD

| | | |
|---|---|---|
| Back Page - A4 | Color | INR 30,000 |
| Back Inside - A4 | Color | INR 25,000 |
| Cover Inside - A4 | Color | INR 25 000 |
| Advertorial - 2 A4 Pages | | INR 25,000 |
| Inside Magazine - A4 | Color | INR 20,000 |

Agency Commission, Special Discount can be offered selectively.

- Artwork to be provided by the client. We can help in design, at cost.
- Confirmation of advertisement space against 100% advance payment.
- Account Name: Vishwa Panthastha,
  Bank: SBI Wakad Pune

## ABOUT VISHWA PANTHASTHA (विश्व पांथस्थ)

- This magazine is published with focus on Non Resident Indians staying abroad. Language Marathi and Hindi. Publishing since 2016. Registered with RNI. Only such Marathi Hindi magazine dedicated for NRIs.
- We insist on print. Quality is maintained in print. We also circulate the magazine in soft copy over social and digital media, total reach could be over 20,000 + across the world. The readers include NRIs, OCIs, PIOs across 20+ countries, their relatives, friends, readers in various states in India.
- Hon Chief Minister of Maharashtra and many other dignitaries have praised Vishwa Panthastha for its objective and consistent work.
- Previous issues soft copy is available on www.panthastha.info
- Dr Sandeep Kadwe, Publisher and Editor of Vishwa Panthastha, is PhD in Economics, on topic “NRI Remittances from GCC” and has written a book “NRI Remittances”, published in 2012 in Dubai. He is a mentor, entrepreneur, investment banker, venture enthusiast, businessman, farmer and social activist with over 33+ years of experience across the world. He is an Engineer and MBA and served on Board of Directors of many companies within and outside India. He is Managing Partner of Incubate Partner, which offers mentoring and incubation to start ups in India and abroad.
- We are already working on creating a database of NRIs across the world through a single portal.
- Vishwa Panthastha also works on Social Impact Projects, helping NRIs and Indian citizens within and outside India.

**Web App site www.panthastha.com**
**Website : www.panthastha.info**
**Editors Contact: editor@panthastha.com and Mobile: +91 9860678844 WA**

Vishwa Panthastha CR No. MAHBIL/2018/69261

पांथस्थ फार्म स्टे पुण्यापासून १४० किमी. विठ्ठलवाडी. शांत निसर्ग. विविध झाडे. पक्षी. वेगवेगळी शेती. पायवाट. तुम्ही व तुमच्या कुटुंबासाठी. दोन दिवस सवडीने निसर्गाच्या सानिध्यात येऊन राहण्यासाठी. पांथस्थ फार्म स्टे. काहीच करू नका. फक्त निसर्गासोबत राहा. अवलोकन करा. सगळ्यात सुंदर वेळ म्हणजे पहाटेची व सायंकाळची. नयनरम्य सूर्योदय व सूर्यास्त अनुभवा.



Panthastha Farm Stay 140 km from Pune. Vitthalwadi. Peaceful nature. Trees. Birds. Various farms around. The trail. You and your family. Come and stay at Panthastha Farm Stay for two days to get close to the nature. Do Nothing Just be with the nature. Observe. The most beautiful time is the morning and the evening. Experience the picturesque sunrise and sunset.

**Contact:**

**farmstay@panthastha.com | WhatsApp +91 9860678844**